अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क्र. २४९२१२९२, २४९२२६१८
E-mail addlcpacbmumbai@mahapolice,gov.in
दिनांक :- २३/०१/२०२६

## -: प्रेसनोट :-

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.र.क्र | ०१/२०२६ |
| कलम | कलम ७, ७ (अ) व १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | १) राजेंद्र शिवाजी व्यवहारे, ३५ वर्षे, पो.शि.क्र. ११०८००, वि.प.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई<br>२) राजेंद्र सर्जेराव आंबीलवाड, ३७ वर्षे, पो.शि.क्र. १३०५८१, वि.प.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई<br>३) राजसिंग शिवकुमार सिंग, ३१ वर्षे, खाजगी इसम, व्यवसाय - पानशॉप, मुंबई |
| लाचेची मागणी | गुडलक म्हणुन रूपये २०,०००/- व दरमहा रू. १०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रुपये १५,०००/- |
| हस्तगत लाचेची रक्कम | रुपये १५,०००/- |
| थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार यांचा इम्पोर्टेड सिगारेट विक्रीचा व्यवसाय आहे. दिनांक १६/०१/२०२६ रोजी तक्रारदार यांना लोकसेवक क्र. १ व २ यांनी प्रत्यक्ष भेटून विनापरवाना इम्पोर्टेड सिगारेट विक्रीच्या गुन्हयात आरोपी न करण्याकरीता गुडलक म्हणुन रूपये ४०,०००/- व प्रत्येकी रू. ५,०००/- प्रमाणे दरमहा रू. १०,०००/- हप्ता दयावा लागेल असे सांगून लाचेची मागणी केली परंतू तक्रारदार यांनी त्यांच्याकडे ऐवढे पैसे नमल्याचे सांगून विनंती केल्याने लोकसेवक क्र. १ व २ यांनी तडजोडीअंती गुडलक म्हणून रू. २०,०००/- व दरमहा रू. १०,०००/- दयावे लागतील असे सांगून लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसेवक यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १९/०१/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १९/०१/२०२६, २०/०१/२०२६ व २१/०१/२०२६ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक क्र. १ व २ यांनी तक्रारदार यांच्याकडे गुडलक माठी रू. २०,०००/- व दरमहा हप्ता रू. १०,०००/- लाचेची मागणी करून गुडलक मधील पहिला हप्ता म्हणून रूपये १५,०००/- लाच खाजगी इसम राजसिंग शिवकुमार सिंग यांच्याकडे देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक २२/०१/२०२६ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान प्रत्यक्षभेटी वेळी लोकसेवक क्र. १ यांनी व लोकसेवक क्र. २ यांनी फोनद्वारे तक्रारदार यांना रू. १५,०००/- लाचेची रक्कम खाजगी इमस राजसिंग शिवकुमार सिंग यांना देण्यास सांगितले. खाजगी इसम राजसिंग शिवकुमार सिंग यांना लोकसेवक क्र. २ यांचे सांगण्यावरून तक्रारदार यांच्याकडून लाचेची रक्कम रू. १५,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तद्नंतर तात्काळ लोकसेवक क्र. १ यांना ताब्यात घेण्यास आले असून लोकसेवक क्र. २ हे अद्याप फरार आहेत. म्हणुन उपरोक्त नमूद लोकसेवक व खाजगी इसम यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७, ७(अ), १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**सापळा अधिकारी :- श्री. सुनिले हारुगडे, सहाय्यक पोलीस आयुक्त. पर्यवेक्षक अधिकारी:- श्री. नितीन थोरात, पोलीस निरीक्षक.**

मार्गदर्शक अधिकारी :- श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( अजित मुळे )
सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**

**टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२९२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८**

**व्हॉट्सअप क्र. :- 8828241064 मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net**

**वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in**

**ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**

**फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB**